<u>किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ११४७/२०२३</u>
<u>शशिकला स्वामी विरूध्द सोलापूर म.न.पा.</u>
**CNRNOMHSO**040037722023

<u>निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत</u>
(दिनांक ०२.०१.२०२४)

१. अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज अर्जदारचे पती **सुनील गुरुलिंगय्या स्वामी** यांच्या **मृत्यु तारखेची नोंद** जन्म–मृत्यू नोंदणी रजिष्टरमध्ये घेण्याकरीता सामनेवाला यांचेविरुध्द निर्देश मिळण्याबाबत जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १३(३) अन्वये सादर केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरील सामनेवाला यांचे म्हणणे वाचले. अर्जदाराने सादर केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदारांतर्फे वकील श्री. एम. एल. यल्ला यांचे म्हणणे ऐकले.

३. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे अर्जदारच्या पतीचा मृत्यु **दि. १४.१२.२०२०** रोजी सुशिल नगर, विजापूर रोड, सोलापूर येथे रहाते घरी झाला. परंतु नजरचुकीने व अनावधानाने सामनेवाला यांचेकडे मृत्युची नोंद करावयाची राहिली. तसेच सदर **मृत्यु तारखेची** नोंद सामनेवाला यांचे दप्तरी उपलब्ध नसल्याचे त्यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देवून कळविले. अर्जदारांना वैयक्तीक कामाकरीता अर्जदारच्या पतीच्या मृत्यु दाखल्याची गरज असल्यामुळे सामनेवाला यांनी त्यांच्या पतीच्या मृत्युची नोंद जन्म–मृत्यु नोंदणी रजिष्टर मध्ये घेण्याचे निर्देश मिळविण्याकरीता प्रस्तुत अर्ज सादर केला.

४. निशाणी क्र. ०८ नुसार सामनेवाला यांनी लेखी उत्तर सादर करुन अर्जदारच्या पतीच्या मृत्युची नोंद त्यांच्या दप्तरी नसल्यामुळे त्यांनी अनुउपलब्धता प्रमाणपत्र दिल्याचे कळविले.

५. अर्जदाराने **दि. ०६.०९.२०२३** रोजी प्रकाशित झालेल्या **"नालंदा एक्सप्रेस"** या दैनिक वृत्तपत्रात जाहीरनामा प्रकाशीत करुन आक्षेप मागविण्यात आला होता. परंतु अर्जदाराच्या मागणी संदर्भात आजतागायत कोणाचाही आक्षेप आलेला नाही.

६. अर्जदारांनी अर्जाच्या पुष्ठ्यार्थ निशाणी क्र. ०९ वर तिचे व निशाणी क्र. १० व ११ वर स्वतंत्र साक्षीदार नामे रविचंद्र सुनील स्वामी व ऋषिकेश सुनील स्वामी यांचे सरतपासणीचे शपथपत्रे सादर केले आहेत. अर्जदाराने निशाणी क्र ०३ वरील दस्तऐवजाच्या यादीसह मयताचे व अर्जदाराचे आधारकार्ड सादर केले असून निशाणी क्र.

०७ वरील दस्तऐवजाच्या यादीसह मृत्यु नोंदणी अनुउपलब्धता प्रमाणपत्र दाखल केले आहे.

**७.** जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १३(३) अन्वये न्यायदंडाधिकारी यांनी जन्म–मृत्यू नोंदणी अधिकारी यांना जन्माची किंवा मृत्युची नोंद घेण्याकरीता निर्देशीत करीत असताना त्या व्यक्तीच्या जन्म किंवा मृत्युच्या सत्यतेबाबत पडताळणी करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदारांनी अर्जदारच्या पतीची मृत्यु तारीख **दि. १४.१२.२०२०** आहे, असे दर्शविण्याकरीता साक्षीदाराचे शपथपत्रे सादर केले, ज्यात त्यांच्या पतीची मृत्युतारीख दि. १४.१२.२०२० असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यावरुन अर्जदारच्या पतीच्या मृत्यु तारखेची सत्यता पडताळली. अर्जदारांचा तोंडी व कागदोपत्री पुरावा अभिलेखावर अबाधीत असल्यामुळे अविश्वास दर्शविण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदाराने मांडलेले कथन विश्वसनीय असल्याचे दिसून येते. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला सोलापूर महानगरपालिका, जिल्हा सोलापूर यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदारांकडून आवश्यक नोंदणी विलंब शुल्क भरुन घेवून अर्जदारचा पती **सुनील गुरुलिंगय्या स्वामी** यांच्या मृत्यु दिनांक **१४.१२.२०२०** या तारखेची नोंद जन्म–मृत्यु नोंदणी रजिष्टर मध्ये करावी.

स्वाक्षरीत/–

**(दिप्ती दि. कोळपकर)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

(महानगरपालिका न्यायालय), <u>**सोलापूर**</u>

दिनांक : ०२.०१.२०२४

स्थळ : सोलापूर

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P. D.F file order are same word to word, as per the original order."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | **Pratiksha Vishal Pawar.** |
| Name of Court | :- | J.M.F.C. (Municipal Court), Solapur |
| Order dictated on | :- | **02.01.2024** |
| Order signed by the Presiding Officer on | :- | **02.01.2024** |
| **Order uploaded on** | **:-** | **02.01.2024** |